# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172**

No:- **CGRF/AZ/AUR/R / 305 / 2010 / 03 2 /** **Date :-**

To,

1. The Nodal Officer
   O/O, SE(Rural ) Circle, MSEDCL,
   Aurangabad.

2. Shri Keshav Rangnath Nahulikar,
   (User Name Sunil Keshavrao Nahulikar,
   Paithan Road, Aurangabad.
   ( Con. No.493010019288 )

**CASE NO: CGRF / AZ / AUR / R / 305 / 2010 / 32**

Sub:- Grievance under the Maharashtra Electricity Regulatory Commission ( Consumer Grievance Redressal Forum & Ombudsman ) Regulation 2006

**INTERIM ORDER**

The consumer has filed his grievance in the Forum regarding the average bills showing faulty status issued by D.L. Consumer repeatedly applied for revision of energy bill as per the meter reading but bills are not revised nor the meter reading is taken therefore the consumer not paid the bills since 27.09.2007. The supply of consumer is disconnected during August 2010. The arrears outstanding against the consumer as on June 2010 is Rs.39,740/-. The consumer requested the Forum to issue the order for revision of energy bill as per meter reading. In spite of the instructions of the Forum the Nodal Officer had not submitted the reply and CPL of the consumer during hearing, and requested to grant the next date of hearing. The consumer requested to Forum to pass an interim order with the direction to the D.L. to reconnect the supply. Consumer also shows his willingness to make the part payment of electricity bill provisionally. Heard both the sides and Forum pass the order as:-

D.L. is directed to issue the provisional bill of Rs.10,000/- to the consumer and reconnect the electricity supply within 24 hours after payment of above energy bill.

Matter fixed on 07.10.2010.

**(Vilaschandra S. Kabra)**
**Member**

**( P . A. Sagane)**
**Member/Secretary,**

**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.**

तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रामीण/३०५/२०१०/३२

तक्रार दाखल दिनांक :- २०/०९/२०१०
निकाल दिनांक :- १९/११/२०१०

श्री केशवराव रंगनाथ नाहुलीकर,
मार्फत सुनील केशवराव नाहुलीकर,
श्रीनाथ कॉलनी प्लॉट नबर २२,
पैठण जिल्हा औरंगाबाद
(ग्राहक क्र.४९३०१००१९२८८) अर्जदार/ग्राहक

विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत ग्रामीण विभाग औरंगाबाद.

गैरअर्जदार

| | | |
|---|---|---|
| कोरम | प्रदीप. अ. सगणे | अध्यक्ष/सदस्यसचिव |
| | विलासचंद्र सु. काबरा | सदस्य |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे.अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २०/०९/२०१० रोजी औरंगाबाद ग्रामीण मंडळाचे कार्यकारी अभियंता (प्रशासन) व नोडल अधिकारी,औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २४/०९/२०१० रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) ग्राहकाने महावितरण कंपनीकडुन घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन त्याचा ग्राहक क्रमांक ४९३०१००१९२८८ असा आहे. ग्राहकास माहे जुलै २०१० मध्ये ३९७४०/-रुपयाचे वीज देयक देण्यात आले ते वीज देयक चुकीचे असुन मीटर रिंडींग न घेता फॉल्टी स्टेटस टाकुन देण्यात आले. ग्राहकाने वरील वीज बिलाचा भरणा न केल्यामुळे त्याचे मीटर काढुन वीज पुरवठा जुलै २०१० मध्ये कायमचा बंद करण्यात आला. ग्राहकाने दिनांक ०९/०८/२०१० रोजी महावितरण कंपनीचे पैठण येथे उपविभागीय कार्यालयात अर्ज दाखल करुन सुधारीत वीज बिल देण्याबाबत विनंती केली तसेच ग्राहकाची मुले शिक्षण घेत असुन घरात आई आजारी असल्यामुळे सुधारीत वीज देयक मीळेपर्यंत रुपये ५०००/-चा तात्पुरता भरणा करुन घेवुन वीज पुरवठा सुरु करावा अशी विनंती कंपनीस केली परंतु कंपनीने त्यांच्या अर्जावर कार्यवाही न केल्यामुळे त्यांनी मंचात तक्रार दाखल करुन,सुधारीत वीज बिल देण्याबाबत व थकबाकी पोटी रुपये ५०००/- भरुन वीज पुरवठा सुरु करण्याबाबत कंपनीस आदेश देण्याची विनंती मंचास केली.

२) ग्राहकाचा वीज पुरवठा बंद असल्यामुळे त्यांच्या अर्जानुसार अंतरिम आदेश देण्याबाबतची सुनावणी दिनांक २४/०९/२०१० रोजी ठेवण्यात आली. सुनावणीस नोडल अधिकारी श्री सौदागर कार्यकारी अभियंता ग्रामीण मंडळ औरंगाबाद व श्री स्वामी सहा.अभियंता पैठण तसेच वीज ग्राहक उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या ग्राहकाच्या सी.पी.एल.नुसार असें आढळुन आले की, ग्राहकास सन २००४ सालापासुन ब-याच वेळा मीटर रिडींग न घेता सरासरी पध्दतीने वीज आकारणी करण्यात आली. त्यामुळे ग्राहकाने २७/०९/२००७ पासुन वीज बिल भरलेले नाही. त्यामुळे त्याचा वीज पुरवठा जुलै २०१० मध्ये कायमस्वरुपी बंद करण्यात आला. ग्राहकाकडे एकुण थकबाकी ३९७३७.५५/- प्रलंबित असल्याचे दिसुन येत आहे. दोन्ही बाजुचे म्हणने ऐकुण घेतल्यानंतर मंचाने ग्राहकाकडुन रुपये १०,०००/- अग्रीम राशी भरुन घेवुन वीज पुरवठा सुरु करावा असे आदेश महावितरण कंपनीस अंतरिम आदेशाद्वारे देण्यात येवुन पुढील सुनावणी दिनांक ०७/१०/२०१० रोजी ठेवण्यात आली.

३) दिनांक ०७/१०/२०१० रोजी झालेल्या सुनावणीस वीज ग्राहक उपस्थित होते. महावितरण कंपनीतर्फे श्री डी.बी. सिरवत उच्चस्तर लिपीक उपस्थित होते त्यांनी अधिक्षक अभियंता ग्रामीण मंडळ यांचे पत्र दाखल करुन नोडल अधिकारी यांची बदली झाल्यामुळे संबंधित प्रकरणाची कागदपत्रे सादर करण्यास व सुनावणीची पुढील तारीख देण्याबाबत विनंती मंचास केली. मंचाने नोडल अधिकारी यांना आपले म्हणने मांडण्याकरिता व कागदपत्र सादर करण्याकरीता शेवटची संधी म्हणुन सुनावणीची तारीख २०/१०/२०१० पर्यंत तहकुब करण्यात आली.

४) दिनांक २०/१०/२०१० रोजी झालेल्या सुनावणीस नोडल अधिकारी श्री ए.एस.पाटील व श्री स्वामी सहा.अभियंता पैठण तसेच वीज ग्राहक उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी लेखी निवेदन सादर करुन ग्राहकाचे सी.पी.एल.,पी.डी.रिपोर्ट व वीज दुरुस्ती अहवाल मंचात सादर केला. तसेच मंचाचे

अंतरिम आदेशानुसार ग्राहकाने रुपये १०,०००/- चा भरणा दिनांक १६/१०/२०१० रोजी केल्यानंतर वीज पुरवठा सुरु करुन देण्यात आल्याचे सागीतले. दोन्हीबाजुकडुनचे म्हणने ऐकुण घेतल्यानंतर प्रकरण निकालासाठी ठेवण्यात आले.

५) दोन्ही बाजुकडुन दाखल झालेल्या कागद पत्रावरुन असे दिसुन येते की, ग्राहकास २००४ पासुन ब-याचदा मीटर रिडींग न घेता सरासरी पध्दीने आकारणी करण्यात आल्याचे दिसुन येते परंतु मीटर रिडींग झाल्यानंतर पुर्वी आकारण्यात आलेल्या युनिटची विभागणी संगणकाद्वारे झाल्याचे दिसुन येत आहे. ग्राहकाचे सी.पी.एल. चे निरिक्षण केले असता ग्राहक नियमीतपणे वीजेचे बिल भरत नसल्याचे दिसुन येत आहे.थकीत बाकी न भरल्यामुळे मार्च २००७ मध्ये वीज पुरवठा कायमचा खंडीत केला असल्याचे दिसुन येत आहे. त्यावेळी ग्राहकाकडे रुपये ३२९८२.१३/- थकीत बाकी प्रलंबित होती ग्राहकाचा वीज पुरवठा ऑक्टोबर २००७ मध्ये जोडुन देण्यात आला.त्यावेळी महावितरण कंपनीने ग्राहकाकडी वरील थकीत बाकीची रक्क्म पुर्णपणे वसुल करणे अवाश्यक होते परंतु केवळ रुपये ११०००/- दिनांक २७/०९/२००७ रोजी भरुन घेवुन वीज पुरवठा जोडुन देण्यात आला. कायमचा खंडीत केलेला वीज पुरवठा जोडतांना ग्राहकाकडील थकीत बाकी पुर्णपणे का वसुल केली नाही या बाबतचा खुलासा मंचाने विचाल्यानंतर नोडल अधिकारी खुलासा करु शकले नाहीत. महावितरण कंपनीने वीज पुरवठा जोडुन दिल्यानंतर ग्राहकाने एकही वीज बिल भरले नाही व अखेर दिनांक ०४/०८/२०१० रोजी ग्राहकाचा वीज पुरवठा पुन्हा कायमचा बंद करण्यात आला त्यावेळी ग्राहकाकडे रुपये ३९७३७.५५/- थकीबाकी असल्याचे दिसुन येते आहे. यावरुन असे दिसुन येते की, दिनांक २७/०९/२००७ ते ०४/०८/२०१० या ३ वर्षाच्या कालावधीत ग्राहक वीज पुरवठा वापरत होता परंतु महावितरण कंपनीने थकीत बाकी वसुली बाबत कोणतीही कारवाई केली नाही व ग्राहकाने सुध्दा वीज बिल भरलेले नाही. यावरुन थकबाकी वसुली बाबत महावितरणच्या पैठण उपविभागाचे उदासीन धोरण दिसुन येत आहे.

६) ग्राहकाचे सी.पी.एल. वरुन असे दिसुन येते की माहे डिसेंबर २००९ ते जुन २०१० या कालावधीमध्ये ग्राहकास फॉल्टी स्टेटस दाखवुन सरासरी ५८ युनिट प्रति माह आकारणी करण्यात आली. मंचाने वरील बाब लक्ष्यात आणुन दिल्यानंतर नोडल अधिकारी यांनी पी.डी.रिपोर्ट नुसार अंतीम मीटर वाचण गृहीत धरुन जुन २०१० अखेर प्रलंबित थकीत बाकी रक्कमेवर रुपये ३४१.१७/- क्रेडीट दर्शविणारा बिल दुरुस्ती अहवाल सादर केला तो योग्य आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने ग्राहकास माहे जुन २०१० अखेर प्रलंबित थकबाकी (रुपये ३९७३७.५५/-) मधुन रुपये ३४१.१७/- वजावट करुन सुधारीत वीज बिल द्यावे.

२) सुधारीत वीज बिलातुन ग्राहकाने मंचाच्या अंतरिम आदेशानुसार भरणा केलेली रक्कम रुपये १०,०००/- वजा करावे.

३) ग्राहकाने लेखी विनंती केल्यास वरील सुधारीत वीज बिल दोन समान हप्त्यामध्ये भरण्यास मंजुरी देण्यात यावी.

वरील आदेशाचे पालन करुन त्याचा अहवाल तीस दिवसांच्या आंत मंचास सादर करावा.

**प्र. अ. सगणे**
**सदस्य/सचिव**

**विलासचंद्र सु. काबरा**
**सदस्य**